**L. A. BILL No. LIII OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA POLICE ACT AND THE MAHARASHTRA PROHIBITION OF OBSCENE DANCE IN HOTELS, RESTAURANTS AND BAR ROOMS AND PROTECTION OF DIGNITY OF WOMEN (WORKING THEREIN) ACT, 2016.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३.**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९५१ चा २२. २०१६ चा महा. १२.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ यांमध्ये आणखी सुधारणा

करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

## प्रकरण दोन

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम यामधील सुधारणा.

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र पोलीस अधिनियम (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश, "पोलीस अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (६अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः— १९५१ चा २२.

"(६अअ) "प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा)" याचा अर्थ, कोणत्याही हॉटेलमध्ये, उपाहारगृहामध्ये किंवा मद्यपान कक्षामध्ये (बार रुम) वाद्यांचा किंवा ध्वनिमुद्रण साधनांचा वापर करून संगीतासह किंवा संगीताशिवाय एकतर वैयक्तिकरीत्या किंवा गटामध्ये केले जाणारे गाण्याचे सादरीकरण, असा आहे;".

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ३३ ची सुधारणा.

**३.** पोलीस अधिनियमाच्या कलम ३३ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(क) खंड (डब्ल्यु) मधील, उप-खंड (१) मध्ये, "सार्वजनिक मनोरंजनाचे" या मजकुराआधी, "कोणतेही हॉटेल, उपाहारगृह किंवा बार ज्यामध्ये प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) सादर केले जाते त्या खेरीज" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(ख) खंड (डब्ल्यु-अ) मधील, उप-खंड (१) मध्ये, "गाण्याच्या" या मजकुराआधी "कोणत्याही हॉटेलमध्ये, उपाहारगृहामध्ये किंवा बारमध्ये सादर केल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) या खेरीज" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ याची सुधारणा.

२०१६ चा महा. १२.

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम २ ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (७) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(७अ) "प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा)" याचा अर्थ, कोणत्याही हॉटेलमध्ये, उपाहारगृहामध्ये किंवा मद्यपान कक्षामध्ये (बार रुम) वाद्यांचा किंवा ध्वनिमुद्रण साधनांचा वापर करून संगीतासह किंवा संगीताशिवाय एकतर वैयक्तिकरीत्या किंवा गटामध्ये केले जाणारे गाण्याचे सादरीकरण, असा आहे;".

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, "नृत्ये" या मजकुरानंतर, "किंवा प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी ८९८—२ (२५५-७-२०२६)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३.]**

**[महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.]

**[विधानसभेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.